# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 11/02/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावर आमडी येथे दिनांक 10/02/2021 चे 17.10 वा. ते 18.40 वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच– 18/जे– 8071 क्रमांकाचा दहा चक्का ट्रकला थांबवुन तपासणी केली असता ट्रक मध्ये एकुण 53(बैल) कि. 4,24,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) अयुब खॉ शमीद खॉ, वय 32 वर्ष, रा. पिपलई, राजनवाडी ता. जि.रायसेन म.प्र. व 2) फरार आरोपी चालक– मोहम्मद सिध्दीकी रा. पवई जि.विदीशा म.प्र. यांच्या ताब्यातुन 53 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 14,24,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. अतुल बांते, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(अ)11(1)(ड),11(1)(इ),11(फ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, तसेच कलम 119 मोवाका सहकलम 429 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रमोद राउत हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक श्रीमती नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री प्रमोद मकेश्वर, सपोनि शेंडगे, पोउपनि श्री प्रमोद राउत, पोशि गोविंद खांडेकर, आकाश श्रीरसाठ, अतुल बांते, रूपेश शेंद्र, राजु पोले हे केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर